INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# महिला सक्षमीकरण बचत गटाचे योगदान आणि महिला आर्थिक विकास मंडळाची भुमिका

**प्रा. दिपाली दि. बांबल (CHB.)**
या . द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय तिवसा .जि.अमरावती

भारतात १९९० साली 'राष्ट्रीय महीला आयोग कायदा' स्थापन करण्यात आला . त्यात माहिलांची स्थिती सुधारण्यासाठी केंद्र आणि राज्य शास नाला आर्थिक परिणामांविषयी आणि संरक्षणाविषयी शिफारशिंची अंमलवजावणी भर देण्याचे 'लक्ष्य' निर्धारित केले.

महिलांचा विकास आणि कल्याण करण्याच्या दृष्टिने त्यांना आर्थिक स्थैर्य मिळणे आणि राष्ट्राच्या विकास प्रवाहात त्यांचा समावेश क रून घेणे, त्यांच्या हक्काची जाणिव, संरक्षण आणि समानता असे अनेक उ दिष्टये महिला सक्षमिकरणात सामावलेले आहेत.

एखादे काम अधिक लक्षवेधी (Goal Achive) होण्यासाठी अधिक प्रेरणा , निर्धार करण्याची गरज असते. स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजना , १९९९ अंतर्गत महिला स्वयंसहा य्य गटाची स्थापना करुन तळागाळातील, अल्प उ त्पनधारक महिलांच्या उन्नतीचे, सबलीकरणाचे मार्ग विकासा च्या टप्प्याची आधार शिला ठरलेली आहे असे दिसुन येते. कारण Self Help Group हि योजनामहिलांचे आर्थिक, मानसिक ,सर्वागीण विकासाचास्त्रोत ठरत आहे.

**स्वयंसहाय्य गटाची संकल्पना:**

“स्वत:च्या विकासासाठी, लक्ष्य प्राप्तीसाठी स्वत:ची मदत स्वत: करणे हि संकल्पना या योजनेत राबविण्यात आली आहे . सरकारने पुरस्कृत केलेली ही योजना आहे . ही योजना सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (SwarnJayantiGram Swa-Rojgar) चा ए क भाग आहे . एप्रिल १९९९ म ध्ये स्वयंसहाय्य गटाची स्थापना करण्यात आली.”

दारिद्रयरेषेखालील, आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या महिलांना आत्मसंन्मानाने जगता यावे हा प्रमुख हेतु स्वयंसहाय्य गट योजना राबवि ण्यात आली.

**महिलांचे आर्थिक सक्षमीकरण** :

स्वयंसहाय्य गट(बचत गट ) माहिलांच्या विकासाला दिशा आणि गा ती देणारी बाब ठरल्याचे दिसून येते. महिला समुहाच्या विकासासाठी 'बचत गट' हि संकल्पना महिलांची कार्यक्षमता, हाती घेतलेल्या कामातील उत्पादकता आणि आर्थीक प्राप्तीची परिणामकारकता या दृष्टिने स्वयंसहाय्य गटाचे महत्व अबाधित आहे . स्वयंसहाय्य गट योजनेच्या अंतर्गत महिलांना मिळणारे प्र शिक्षण, मार्गदर्शन आणि व्यवसाय सुरु करण्यासाठी मिळणारे अल्प व्याजदरातील कर्ज या तीनही मुलभुत बाबी माहिलांच्या आर्थिक विकासात महत्वपुर्ण ठरल्या.

स्वयंसहाय्य गटातुन 'कुटुंबाचा विकास म्हणजे समाजाचा विकास' ही धारणा शक्ती कुटुंबात असल्यामुळे सभासदाचांही. सहभाग लाभतो. तत्कालीन परिस्थितीत जी गरज तिव्र असेल, ज्याला मागणी असेल अश्याच व्यवसायाला प्राधान्य दिल्या जाते. प्राप्त संसाधने वापरून अधिकाअधिक उत्पादनात वाढ करणे हे गटाचे धोरण असते. ‘ज्ञान, तंत्रज्ञान आणि विकास’ या तिनही बाबींचा मेळ घालुन उत्पादन क्षमता वाढविण्या चा जाणिव पुर्वक प्रयत्न केला जातो . त्यामुळे गटातील माहिलांचे आर्थिक

सक्षमिकरण घडवुन आणण्यात यश प्राप्त हो ते. महिलांच्या आर्थिक स क्षमिकरण म्हणजे त्या ज्या कुटुंबांशी संलग्नित आहेत. अशा कुटुंबांचे समृध्दीकरण, याचाच अर्थ माहिलांचा सर्वांगीण विकास होय.

**महिला सक्षमीकरणात महिला आर्थिक विकास मंडळाची भुमिका :-**

भारत सरकार आणि राज्य शासन यांनी वेळोवेळी महिलांच्या विकासाकरिता योजना राबविल्याचे दिसुन येते. माहिला आर्थिक विकास मंडळ हि योजना महाराष्ट्र शासन पुरस्कृत आहे. तर स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजना हि भारत सरकार पुरस्कृत आहे. स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजनेचा एक भाग 'स्वयंसहाय्य गट' हा महिलांच्या आर्थिक विकासा करिता पुरस्कृत केला आहे . या दो न्ही योजनांमध्ये महिला केंद्रस्थानी आहेत.याचाच अर्थ असा की, महिलांच्या उन्नतीकरीता यात प्र शिक्षण, कर्ज प्रबोधन अश्या बाबी शासनाच्या माध्यमातुन महिलांना पुराविल्या जात आहे . या दो न्ही योज ना अल्प उत्पन्नधारक महिलांच्या आ र्थिक विकासासाठी असल्यामुळे परस्पर पुरक आहेत. म्हणुनच महिला स्वयंसहाय्य गटात माहिला आर्थिक विकास मंडळ स्वयंरोजगारातील महत्वपुर्ण भुमिका बजावताना दिसुन येते. या संबंधिची सविस्तर माहिती पुढे दिलेली आहेत.

**माहिलाआर्थिक विकास मंडळ ( मा.वि.म.) :-**

महिला आर्थिक विकास मंडळ ' माविम' या संक्षिप्त नावाने सर्वत्र प्रसिद्ध आहे.

**स्थापना** :- २४ फ्रेब्रुवारी, १९७५ समाज कल्याण महाराष्ट्र शासनामार्फत करण्यात येते.

**माविम धोरणात्मक दृष्टिकोन/ उद्दीष्टे:-**

i) महाराष्यातील जास्तीत जास्त गरजु माहीलांचा व्याक्तिमत्व विकास घडवुन, त्यांच्यात आर्थिक विकासाचा पाया घडवून, आर्थिक विकासाची वाढ करणे हे माविमचे ब्रिद होय.

ii) त्याकरिता महिलांना प्रशिक्षण देणे.

iii) अर्थीत्पादन होईल अशा कामाच्या संधी उपलब्ध करून देणे.

iv) म हिलांमध्ये स्वावलंबनाची भावना विकसीत करणे, म्हणजे माहिला आत्मविश्वासपुर्ण व कार्यक्षम होतील.

v) व्यवसाय, उत्पादन कार्य, सेवा उद्योग अशा अर्थात्पादनाच्या क्षेत्रात पदार्पण करातील व त्यायोगे स्वयंरोजगार उभे करण्यात समर्थ होतील. अश्या पद्धतीने आर्थिक मदत देणे.

**आर्थिक मदतीचे स्वरूप :-**

उदयोगासाठी जास्तीत जास्त – ३५ हजार

सेवांसाठी - २५हजार

शेतकी उपक्रम उदयोगासाठी - १५हजार

**अर्थसहाय्य मिळविण्याचे मार्ग :-**

जिल्हा उदयोग केंद्राकडे. (D.I.C.) अर्जकरणे आवश्यक आहे. त्याला पुढील प्रमाणपत्र जोडावेत.

१. शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राच्या Zerox ( प्रमाणितकेलेल्या )

२. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्राच्या Zerox

३. तुमचे कौटुंबिक सर्व बाजुने येणारे उत्पन्न,वार्षिक दहा हजारापे क्षा अधिक नसल्याचे प्रमाणपत्र

**शासनाकडुन अर्थसहाय्य :-**

शासन अर्थसहाय्य करते. त्याची परतफेड करावी लागते.

कर्ज मिळविण्यासाठी गहाण (तारण) ( Security ) घेण्याची गरज नाही . लाभार्थी ज्या भागातील असेल, अशा राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज उपलब्ध होते.

**विभागीयकार्यलये :-**

माविमचे विभागीय कार्यालय अमरावती , नागपुर,औरंगाबाद, नाशिक, पुणे, ठाणे येथे आहे.

**माविमकडे चालु असलेल्या योजना :-**

**१. प्रशिक्षण उपक्रम**:- उदयोजकता परिचय शिबिर

२. **व्यवसाय प्रशिक्षण उपक्रम** :- शहरी व दारिद्रयरेषेखालील महिलांसाठी बेकरी , ब्युटीपार्लर, शिलाई, भरतकला.

अ) दुग्ध योजना , आ) केरोसिन वितरण इ) खादयधान्याचा पुरवठा ई) शिवण युनिट उ) पॅकिंग

ऊ) स्टेशनरी तयार करणे एस.टी. स्थानकावर वाजवी दरात झुणका-भाकर विक्री केंद्र चालविणे.

१. **प्रशिक्षण कार्यक्रम** :-

अ) **उद्योजकता प्रशिक्षण उपक्रम** :- महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये महिलासाठी दोन– दोन दिवसांची उद्योजकता परिचय शिबीरेआयोजीत करणे.

ब) **व्यवसाय प्रशिक्षण उपक्रम** :- दारिद्रयरेषेखालील शहरी महिलांसाठी बेकरी, ब्युटीपार्लर, शिलाई,भरतकाम इत्यादी विषयांचे प्रशिक्षण देणे.

क) **इलेक्ट्रॉनिक प्रशिक्षण कार्यक्रम** :- महिलांना २५० रु.स्टायफंड देवुन प्रशिक्षण देतात . त्यानंतर वेगवेगळ्या उदयोग क्षेत्रात नियुक्त करतात.

२. **स्वयंरोजगार योजना** :-

अ) **मालपुरवठा** :- शासकीय व निमशा सकीय संस्थाना मालपुरवठा करणे.

ब) **दुग्ध योजना** :- डेअरी विकास महाराष्ट्र हे दुग्ध पुरवण्यासाठी 'माविम' ची नेमणुक करते. स्त्री व्यवस्थापक आणि एक विक्रेता अशी नेमणुक पंजीकृत महिला मंडळ करते. त्यांना माविम वितरणाचे अधिकार देते. प्रत्येक लोटरमागे ८% नफा मिळतो.

**दुग्ध योजनेसाठी अटी** :- अ) महिला मंडळ पंजीकृत असावे. ब)सेक्युरिटी म्हणुन तीन दिवसांच्या संकल्पना एवढी रक्कम 'माविम' कडे जमा करा वी लागते.

३. **केरोसीन वितरण व्यव स्था** :- हिंदुस्थान पेट्रोलियम कडुन केरोसीन घेऊन नंतर त्याचे वितरण वि विध स्वस्त धान्याच्या दुकानात केल्या जाते . हिशेब ठेवण्यासाठी 'माविम' महिलांची नेमणुक करते.

४. **खाद्य धान्य पुरवठा** :- सरकारी संस्था , वसतिगृहे, समाजकल्याण संस्था यांना खाद्यान्नाचा पुरवठा महामंडळ करते. पंजीकृत महिला मंडळाकडुन निविदा माग विल्या जातात. प्रथमत: सहा महिन्यांचा करार केल्याजातो.

५. **शिवणयुनिट** :- चहाच्या पिशव्या, टॉवेल्स, उशीच्या खोळी महिलांना शिलाई करीता दिल्या जाते . कर्मचारी पॅकिंग ही आजच्या नगामागे पै से दिले जातात.

६. **पॅकिंग** :- आकर्षक पॅकिंग हि आजच्या व्यवसायाची महत्वपुर्ण बाब आहे.पॅकिंग विभाग माविम तर्फ चालविला जातो.

७. **स्टेशनरी तयार करणारे युनिट** :- कमी किमतीत कागदाचा पुरवठा करून माविम कडुन स्टेशनरी तयार करून घेतली जाते.

८. **मोसमीयोजना ( Seasonal Scheme )** :- उदा .सुका मेवा पॅकिंग, दिवाळीचे खाद्यपदार्थ इत्यादी १५ दिवसांसाठी विक्रेते आणि पॅकर्स नेमलेले असतात. कर्मचाऱ्यांना कामाचा प्रतिदिनी मोबदला दिल्या जातो. तसेच महामंडळ विविध कार्यालये, संस्थाना मालाचा पुरवठा करण्यासाठी विक्रेत्या मुलांची नेमणुक करतात.

९. **मशरूम योजना** :- मशरूमची निर्मिती आणि वितरण याकरिता माविम महिलांची नेमणुक केल्या जाते.

**प्रदर्शनभरविणे**:- अ) महिलांनी आणि महिला संस्थांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तुंना बाजारपेठ मिळवुन देण्यासाठी प्रदर्शने आयोजित करणे.

ब) नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहे चालविणे.

**मा.वि.म.ची धोरणात्मक कार्यक्रमाची फलश्रृती :-**

संबधित उप क्रमांवरून स्पष्ट होते की , माविम ही माहिलांच्या आर्थिक विकासाला चालणा देणारी एक योजना म्हणुन यशस्वी ठरते.

कमी पैशात उद्योग सुरु करून आर्थिक दृष्टया सुदृढ बनविण्याकरीता माविम अंतर्गत येणारे कार्य आर्थिक विकासाला पुरक ठरते.

१) प्रकल्प योजना यशस्वी होण्याकडे विशेष लक्ष पुरविल्या जाते.

२) ज्यातुन फायदा होईल आणी खर्चाचा पुरेपुर मोबदला मिळेल. अश्याच कल्याण कारी कामांना प्राधान्य दिल्याचे दिसुन येते.

३) स्वयंरोजगार आणि उदयोग गट यांच्या करिता कोणत्या संधी उपलब्ध आहेत . याचा शोध घेण्याचे कार्य माविम सातत्याने करते. त्यामुळे महिलांना आर्थिक फायदा मिळतो.

**संदर्भसूची :-**

१ कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि आंतर सजावट: २, प्रा. त्रिवेणी फरकाडे आणि सुलभा गोंगे, पिंपळापुरे अॅण्ड कं.पब्लिशर्स, नागपुर (सप्टेंबर २०१७)

२ स्त्री विकासाच्या पाऊलखुणा, डॉ.स्वाती कर्वे, प्रतिमा प्रकाशन , सदाशिवपेठ, पुणे ( ऑगस्ट २००३)

३ महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या १०१ वाटा : श्री.एस.बी.पवार, श्रीकांत पिंटर्स, शनिवार पेठ पुणे (फेबुवारी २०१७)

❖❖❖❖